# ६० वा वार्षिक अहवाल

२०२४ - २०२५



## ‘संकटमोचन MSCEIA’



महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई




**ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**ना. एकनाथजी शिंदे साहेब**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**ना. सुनेत्राताई अजितदादा पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**ना. दादाजी भुसे साहेब**
शिक्षणमंत्री, शालेय शिक्षण महाराष्ट्र राज्य



**ना.डॉ. पंकज भोयर**
राज्यमंत्री शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य



**डॉ. नंदकुमार बेडसे साहेब (IAS)**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

# भावपूर्ण श्रध्दांजली

सन २०२४-२६ या अहवाल सालात जागतिक युद्ध, अतिरेकी हल्ले, महामारी यामुळे मृत्यू पावलेले देशातील नागरिक, सैनिक, पोलीस दलातील कर्मचारी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच काही संघटना पदाधिकारी, संस्थाचालक आणि सभासद, चित्रपट सृष्टीतील अभिनेते, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर; त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांना महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई संघटनेचे सर्व पदाधिकारी, राज्य कार्यकारिणी सदस्य, सभासद, संस्था, शासनमान्य संस्थाचालक परिवारांच्या वतीने

## भावपूर्ण श्रध्दांजली



**मा. उपमुख्यमंत्री नामदार स्व. अजितदादा पवार**

# संघटनेंच्या ६१ वें अधिवेशन यशस्वी करणेसाठी जालना जिल्हा सज्ज - संतोष दाणी



महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन संघटनेचे ६१ वे राज्यस्तरीय अधिवेशन भव्य दिव्य करण्याचा विडा माझे जालना जिल्हा संघटनेने उचलला आहे. मला खात्री आहे राज्यातील सुमारे ४० सदस्य असलेली समस्त कार्यकारिणी, संलग्न जिल्हा संघटना पदाधिकारी आणि माझे जालना जिल्ह्यातील ६२ संस्था हे अधिवेशन यशस्वी करण्याचा प्रयत्न करत आहेत. शिखर संघटनेचे अध्यक्ष प्रकाश कराळे सर यांचेवर राज्यातील संस्था चालकांचा असलेला विश्वास कराळे सरांनी संघटना अध्यक्ष पदाची सूत्रे २००७ साली घेऊन आज संघटना उच्च शिखरावर पोहोचली आहे. संघटनेचे निवडणुकांमुळे जिल्हा संघटना निवडणूक बांधणी मुळे लांबलेले ६१ वे अधिवेशन फक्त दोन महिन्यात घेण्याची जबाबदारी राज्य कार्यकारिणीने माझ्या जिल्ह्यावर टाकली, संघटनेचा महासचिव म्हणून मी जबाबदारी स्वीकारली व ते अधिवेशन यशस्वी होईल अशी ग्वाही देतो.

संघटनेचे माझे सहकारी जिल्हा अध्यक्ष अरुण चव्हाण, सचिव डॉ. सुनील भावसार, कोषाध्यक्ष एस.बी. सहारे, कार्याध्यक्ष सुनील कुलकर्णी, उपाध्यक्ष समाधान मुळे, परीक्षा सचिव प्रभाकर कुदर, कार्यकारिणी सदस्य सौ. आनंदी अय्यर, सौ. शारदा खालापुरे, सुरेश भाडळकर, पवन उफाड, प्रेमदास आडे, जयश्री संघमुळे आदिसह जिल्ह्यातील सर्व संस्थाचालक राज्यातील संस्थाचालक व अधिवेशनाचे प्रमुख अतिथी उपस्थितांच्या स्वागताला सज्ज आहोत. या निमित्ताने राजुरा येथील गणपती श्री दर्शनाचे भाग्य उपस्थितांना लाभणार आहे. अधिवेशनाच्या कार्याला बळ देणारी स्मरणिका 'संकटमोचन MSCEIA' या नावानेच प्रकाशित होणार आहे. कारण संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरू झाला तो २०१३ ला. सन २०१६ व सन २०२३ मध्ये 'बहिस्थ' मुळे मोठे संकट ओढवले. संस्था बंद होतात की काय ही भीती निर्माण झाली असतानाच MSCEIA संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रकाश कराळे सर यांचे नेतृत्वाखाली आझाद मैदान, नागपूर मंत्रालय, मुंबई शिक्षणमंत्री यांचेकडे आंदोलन निवेदनाद्वारे लढा देऊन संस्था चालकांना जीवदान दिले. आजही MSBT/MKCL चा CCTP टायपिंग कोर्स उद्योग व कौशल्य विकास विभागाचा कॉम्प्युटर टायपिंग कोर्स हे शासन आदेश नसताना सुरू झाले. आपले हजारो संस्था चालकांनी भीती व्यक्त केली. संघटनेने अनेक मंत्री, आमदार, खासदार महोदयांची पत्रे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, सर्व यांना देऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या समकक्ष कोर्सला मान्यता देण्यात येऊ नये म्हणून पाठपुरावा केला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे साहेब यांनीही शासनाला पत्र पाठवून विनंती केली. MSCEIA संघटनेचे महासचिव व संघटना अध्यक्ष श्री. प्रकाश कराळे सर मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात याचिका दाखल करून स्थगिती मिळिवण्याचा प्रयत्न करत आहोत. ६१ व्या अधिवेशनात हीच मागणी प्रभावीपणे मांडून संघटनेच्या सर्व अडचणी सोडविण्याचा प्रयत्न आहे. म्हणूनच स्मरणिकेला 'संकटमोचन MSCEIA' नाव दिले असून स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित होणार आहे. सर्व चार हजार संस्थांना डिजिटल स्वरूपात देऊन डिजिटल युगाचा स्वीकार करत आहोत.

या अधिवेशनास हजारोंच्या संख्येने संस्थाचालक परिवाराने उपस्थित राहावे ही विनंती आहे.

**संतोष दाणी**
**महासचिव तथा**
**स्वागताध्यक्ष, ६१ वे राज्यस्तरीय**
**अधिवेशन** MSCEIA

# अध्यक्षीय मनोगत



जालना येथे श्री राजूर गणपतीच्या पावन झालेल्या व आनंदी स्वामींच्या पावन भूमीत दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी

६१ व्या अधिवेशनाचे उद्घाटन समारंभास राज्याचे शिक्षणमंत्री मा. नामदार श्री. दादाजी भुसे साहेब यांनी जालना येथे राजूर गणपतीच्या पावन भूमीत होणाऱ्या अधिवेशनाचे उद्घाटन सोहळ्यास येण्याचे मान्य केल्याने महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबईच्या परिवारात आनंद व उत्साह निर्माण झाला. या अधिवेशनास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री मा. पंकजाताई मुंडे, मंत्री व संघटनेचे आधारस्तंभ गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण, ऊर्जा मंत्री श्री. ना. अतुल सावे, राज्याचे शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी शिक्षणमंत्री लोकमत चिफ एडिटर श्री. राजेंद्र बाबुजी दर्डा, संघटनेचे मार्गदर्शक आ. श्री. तान्हाजीराव मुटकुळे, आ.श्री. राजेश राठोड, आ.श्री. हिकमत दादा उडाण, आ.श्री. नारायण कुचे, आ.श्री. संतोष दानवे, आ.श्री. अर्जुन खोतकर, आ.श्री. बबनरावजी लोणीकर, आ.श्री. परिणय फुके, आ.श्री. संग्रामभैय्या जगताप, माजी केंद्रिय मंत्री श्री. रावसाहेबजी दानवे, खासदार डॉ. कल्याणरावजी काळे, त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक मा.श्री. अजयकुमार बन्सल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नु पी.एम., आयुक्त श्री. महेश चोथे, महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर श्री. राजेश राऊत, शिक्षण उपसंचालक कैलास दातखिळे, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, संघटनेचे मार्गदर्शक शिक्षणमंत्री रमेशराव खानविलकर, माजी शिक्षण संचालक व म.रा.प.प. चे माजी अध्यक्ष श्री. महावीरजी माने, ज्येष्ठ विधीज्ञ श्री. सुधीरजी अक्कार मालेगाव, संस्थाचालक व नूतन नगराध्यक्ष आशिष आतकरे, अमरावती, कायदेशीर सल्लागार, ॲड. एन.बी. नरवडे, ॲड. शेखर दरंदले पाटील, आदि मान्यवरांना निमंत्रित करताना अतिशय आनंद होत आहे.

संघटनेची ६० वी आमसभा आणि ६१ वे राज्यस्तरीय अधिवेशन ५ एप्रिल २०२६ रोजी घेण्याचे राज्य कार्यकारिणीने ठरविले. नंतर अत्यंत अल्प कालावधीत संघटनेचे जनरल सेक्रेटरी व ६१ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. संतोष दाणी व जिल्ह्याचे अध्यक्ष श्री. अरुण चव्हाण व त्यांचे समस्त संयोजक समिती, जालना जिल्हा संघटनेने अधिवेशनाचे भव्य असे आयोजन केल्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो.

६१ वे अधिवेशन 'मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृह व लॉन्स' येथे संपन्न होत असताना व 'संकटमोचन MSCEIA' स्मरणिकेचे प्रकाशन होत असताना हजारो संस्था चालकांचे व्यवसायाचे मुख्य साधन असलेला संगणक टंकलेखन, लघुलेखन प्रशिक्षण व्यवसाय आज ६१ वर्षे नियमितपणे सुरू असून या शासनमान्य प्रशिक्षणा देणाऱ्या हजारो मान्यताप्राप्त टंकलेखन, लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्थांची शिखर संघटना, महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, यशस्वी वाटचाल करत असताना विद्यार्थी व संस्था परिवारांच्या हिताचे अनेक कामे मार्गी लागली. त्याचबरोबर संगणकीय युगात संगणक टंकलेखन हा अभ्यासक्रम सुरू करणारा महाराष्ट्र राज्य हा भारतातील पहिला राज्य ठरला आहे. मॅन्युअल टायपिंग मशीनचे प्रशिक्षण संगणकांवर घेण्यात येऊन संपूर्ण परीक्षा ऑनलाईन घेणारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे ही महाराष्ट्र शासनाची सर्व प्रकारच्या परीक्षा घेणारी स्वायत्त संस्था यशस्वीपणे वाटचाल करत आहे. राज्यातील संगणक व लघुलेखन तज्ज्ञांच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे कर्तव्यदक्ष अधिकारी डॉ. नंदकुमार बेडसे साहेब यांनी अजून एक क्रांतिकारी काम केले ते म्हणजे ऑनलाईन लघुलेखन परीक्षा सुरू करून भारतात महाराष्ट्र राज्य एकमेव राज्य ठरले आहे की, लघुलेखन ऑनलाईन परीक्षा यशस्वी करून आज क्रांती केली

आहे. त्यांच्या काळात अनेक वर्षांचे स्वप्न अपूर्ण असलेले महत्त्वाचे काम म्हणजे पुणे कॅम्प येथे स्व मालकीचे सुमारे १५० कोटींची इमारतीचे काम आज प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पूर्णपणे संगणकीयकरण करण्यात आणि पारदर्शक परीक्षांचे संचालन करण्यात आज यशस्वी वाटचाल करत आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. भविष्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही आमची 'आई' असून महाराष्ट्र राज्यातील चार हजार संस्थांची रोजी रोटीची सावली आहे ती भक्कमपणे कार्यरत राहो. यासाठीच आम्ही संघटनेच्या माध्यमातून शासन स्तरावर प्रभावीपणे काम करत आहोत. यासाठीच अधिवेशनाच्या निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री यांना ६१ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात विनंतीपूर्ण साकडे घालत आहोत, लोटांगण घेऊन नतमस्तक होत आहोत ते पुढील उद्भवलेल्या अनैसर्गिक स्पर्धेसाठी. एक काळ असा होता, भारत आणि राज्यात टंकलेखन (Typing) मशीन उच्च स्थानावर होती. शासनाचे ग्रामपंचायत ते मंत्रालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत टंकलेखन मशीनचा दबदबा होता. २००० नंतर संगणकाचा शिरकाव झाला. हळूहळू हा शिरकाव पूर्ण जगभर पोहोचला. टंकलेखन मशीनची जागा संगणकाने घेतली आणि ज्या कुटुंबाची रोजीरोटी टंकलेखन मशीनवर अवलंबून होती, ती टंकलेखन मशीन कालबाध्य होत गेली. शेवटी आमच्या हजारो संस्थांची रोजीरोटी अबाधित राहावी आणि हजारो संस्थांचे तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे कार्य संगणक युगातही चालू राहावे, यासाठी महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना या शिखर संघटना परिवाराने अनेक अधिवेशने घेतली. शासन दरबारी आवाज उठवला, मागण्या मांडून संगणक टंकलेखन GCC-TBC हा कोर्स शासनाकडून मंजूर करून घेतला. त्याचे श्रेय तत्कालीन शिक्षण मंत्री व लोकमत समूहाचे चीफ एडिटर राजेंद्र बाबूजी दर्डा यांना जाते. सन २०११ मध्ये या अभ्यासक्रमाची घोषणा दर्डा बाबूजींनी अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) येथील २०११ मध्ये झालेल्या सुवर्ण महोत्सवी अधिवेशनात केली आणि ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी शासन आदेश पारित करून संगणक टंकलेखन सुरू करणारा महाराष्ट्र राज्य पहिले राज्य ठरले. यातून आमच्या चार हजार संस्था आणि १० हजार निदेशक परिवारांची रोजीरोटी अबाधित राहिली. राज्यातील संस्था परिवाराची आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची अस्तित्वाची लढाई यशस्वी झाली, याचा आनंद होत आहे.

शिक्षणमंत्री राजेंद्र बाबूजी दर्डा साहेब यांच्यानंतरही राज्याचे सन्माननीय तत्कालीन शिक्षणमंत्री मा. बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे-पाटील, विनोदजी तावडे, आशिषजी शेलार, वर्षाताई गायकवाड, दीपकजी केसरकर आदि मंत्री महोदयांनी राज्यातील संस्था चालकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मोलाची मदत केली. अधिवेशनांना उपस्थिती देऊन संस्था चालकांना व संघटनेला पाठबळ दिले, याचा आवर्जून उल्लेख करणे हे माझे अध्यक्ष म्हणून कर्तव्य आहे. आज २०२६ मध्येही राज्यातील संस्था चालकांचे शासन दरबारी असलेले प्रश्न (मागण्या) आजच्या आमसभा व ६१ व्या अधिवेशनात मांडणे, त्यावर चर्चा करणे आणि त्या मार्गी लावणे हेच मुख्य काम संघटनेचे आहे आणि ते योग्य वेळी योग्यपणे मांडून शासनाकडून शासन आदेश, परिपत्रक काढून मान्य करून घेणे हे अधिवेशनाचे यश असते. याच भावनेतून आज हजारो संस्था, लाखो विद्यार्थी आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद या स्वायत्त संस्थेसाठी मागण्या सादर करत आहे. त्या मान्यवरांकडून मार्गी लागाव्यात ही गणराज चरणी प्रार्थना करतो.

शासनाकडील व परीक्षा परीषदेकडील महत्त्वाच्या मागण्या:

१) सुधारित नियमावली १९९१-२०२६ टंकलेखन, संगणक टंकलेखन, लघुलेखन मान्यता व संचलन. (शैक्षणिक पात्रता ६वी शहरी १ कि.मी. व ग्रामीण ३ कि.मी. अंतर, संस्थाचालकांची प्राचार्य पद, शुल्कवाढ, प्रोप्रायटरशीप, आदि दुरुस्तीसह सादर नियमावलीस) तत्काळ मान्यता देणे.

२) महाराष्ट्र राज्य ज्ञानमंडळ (MKCL) चा CCPT, कौशल्य विकास व्यवसाय शिक्षण मंडळ कॉम्प्युटर टायपिंग यांनी टंकलेखन अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न चालवला, त्यास शासनाचे मान्यता न देणे.

३) शासनाचे महामंडळ : सारथी, बार्टी, महाज्योती, अल्पसंख्याक कामगार मंडळ, अमृत या मंडळांचे प्रशिक्षण अभ्यासक्रमात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा संगणक टंकलेखन GCC-TBC व लघुलेखन GCC अभ्यासक्रमाचा समावेश करून उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना शुल्क परत करणे.

४) महाराष्ट्र राज्यात विनाअनुदानित संस्था चालकांना 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ' योजनेसारखी 'लाडका संस्था चालक' योजना सुरू करून आर्थिक मदत करणेबाबत.

५) महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाचे नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड (NCMC) चे काम चालू असलेल्या शासनमान्य प्राप्त संस्थांना देऊन प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देणे.

६) संगणक टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांना शैक्षणिक दराने विद्युत पुरवठा लागू करणे.

७) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून वर्षात ३ परीक्षांचे आयोजन करणे.

८) महाराष्ट्र राज्यात प्रत्येक तालुक्यात परीक्षा केंद्रासाठी शासनाने आर्थिक मदत करणे.

९) शासनमान्य संस्था या स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रोप्रायटरशिप पद्धतीने स्थापन झालेल्या असल्याने, सुधारित नियमावलीत धर्मादाय संस्था वगळून प्रोप्रायटरशिप पद्धत सुरू ठेवणे.

१०) शासनमान्य प्रशिक्षण संस्थांना कोणतेही अनुदान किंवा आर्थिक मदत नसल्याने शहरी भागात १ कि.मी. व ग्रामीण भागात ३ कि.मी. अंतर पूर्वीप्रमाणे ठेवणे.

११) शासनमान्य प्रशिक्षण संस्थांप्रमाणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. व बायोमेट्रिक हजेरी (आधारबेस) लागू करणे.

१२) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून GCC-TBC ३०, ४०, ५०, ६०, इंग्रजी व मराठी/हिंदी ३०, ४० अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करून देणे.

१३) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे LMS सॉफ्टवेअर सक्तीचे न करता ऑफलाईन व संस्थेच्या लॉगिन मधून उपलब्ध करून देणे.

१४) संगणक टंकलेखन, लघुलेखन प्रशिक्षण, अभ्यासक्रमाची शैक्षणिक पात्रता इयत्ता ६ वी करणे.

१५) संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थांना शासन मान्यता, शालेय शिक्षण विभागीय व हस्तांतर, स्थलांतर मान्यता अधिकार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे देणे.

१६) जिल्हा व विभागीय समित्या गठित करण्याबाबत सुधारित नियमावलीमध्ये तरतूद करणे.

१७) महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेने GCC-TBC परीक्षा, सॉफ्टवेअर स्वतः तयार करुन परीक्षा घेणे अथवा मराठी व हिंदी विषयाच्या परीक्षा सुरळित होणे कामी ठोस निर्णय घेणे.

वरील प्रमाणे शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील प्रमुख मागण्या अधिवेशनात सर्वानुमते सादर करतो. आपण शालेय शिक्षण मंत्री नात्याने मागण्या मार्गी लावून हजारो संस्था व लाखो विद्यार्थी वर्गाला न्याय द्यावा ही विनंती करतो.

अध्यक्ष पदाचे कालावधीत संघटनेचे माझे सहकारी महासचिव संतोष दाणी, वरिष्ठ उपाध्यक्ष घनश्याम कुंवलकर, प्रवक्ते गोवर्धन विरकुंवर, प्रसिद्धी प्रमुख जोसेफ रुबेन, परीक्षा सचिव सुरेश देवरे, कोषाध्यक्ष पंकज ठाकूर, सह कोषाध्यक्ष श्रीकांत जोशी, सहसचिव सुरेश लेडांगे, सर्व परीक्षा सहसचिव, सर्व उपाध्यक्ष व समस्त राज्य कार्यकारिणीचे मला पाठबळ मिळाले याबद्दल त्यांनाही धन्यवाद देतो.

जिल्हा संघटना निवडणूक प्रक्रिया व पदांच्या हव्यासापोटी राज्य संघटनेचे अधिवेशन लांबले त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

जालना जिल्हा संघटनेचे अतिशय कमी वेळेत भव्य अशा अधिवेशनाचे नियोजन यशस्वी केले त्याबद्दल स्वागताध्यक्ष संतोष दाणी, जिल्हाध्यक्ष श्री. अरुण चव्हाण, सचिव श्री.डॉ. सुनिल भावसार, कोषाध्यक्ष श्री. सुखदेव सहारे, उपाध्यक्ष श्री. समाधान मुळे, सर्व जिल्हा कार्यकारिणी, सर्व समित्या व आर्थिक योगदान देणारे राज्यातील, जिल्ह्यातील दानशूर संस्थाचालक, हितचिंतक यांना धन्यवाद देतो. संस्था चालकांच्या कार्याला बळ देणारी तसेच व्यवसायाला मार्गदर्शक ठरणारी स्मरणिका अर्थात 'संकटमोचन' MSCEIA या स्मरणिकेचे शब्दांकन, मांडणी, जोडणी करणाऱ्या स्मरणिका प्रमुख राज्य संघटनेच्या सदस्या लघुलेखन तज्ज्ञ श्रीमती अनुराधा थिटे मॅडम त्यांचे सर्व सहकारी यांनाही धन्यवाद देतो. अगदी कमी कालावधीत 'संकटमोचन' स्मरणिका आज प्रकाशनासाठी उपलब्ध झाली त्याबद्दल सर्व लेखक, देणगीदार यांचेही आभार मानतो.

शेवटी एकच विनंती करतो 'एकत्र तर सर्वत्र' उक्तीप्रमाणे संघटना आहे तर आपण याची जाणीव प्रत्येकांनी ठेवायची असते व आहे. सन २०२४ ते २०२५ या कालावधीत संघटनेची आर्थिक स्थिती व सविस्तर प्रगतीचा अहवाल पुढे स्वतंत्र सादर करत आहे. तो स्वीकारावा हीच विनंती. पुनश्च एकदा सर्वांचे हार्दिक आभार मानतो.

**प्रकाश हिराबाई भिमराज कराळे**
**अध्यक्ष** MSCEIA

**संघटनेच्या ५६ व्या आमसभा निमित्त संघटनेची वाटचाल करणारे अहवाल सालात झालेल्या प्रगतीचा आढावा व पुढील अहवाल वर्षात हाती घेतलेल्या कार्याची सविस्तर माहिती इतंभूत सादर करणे माझे कर्तव्य समजतो.**

## १) संघटनेचे आजीवन सभासद

संघटनेने महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य प्राप्त टंकलेखन, लघुलेखन, संगणक टंकलेखन संस्थांना संघटनेच्या कार्यात सहभागी करून घेत असताना ३१ मार्च २०२३ अखेर ३४०० संस्थांना आजीवन सभासदत्व दिलेले आहे. ३१ मार्च २०२४ व ३१ मार्च २०२५ या कालावधीत १०८ नवीन संस्थांना संघटनेचे आजीव सभासदत्व दिलेले आहे. अखेर संस्थांना व ३१ मार्च २०२५ अखेर ३५०८ संस्थांना संघटनेच्या राज्य कार्यकारिणीने आजीवन सभासदत्व बहाल केलेले आहे. उर्वरित मान्यताप्राप्त संस्थांनी लवकरात लवकर शिखर संघटनेचे सभासदत्व घेऊन संघटनेस सहकार्य करावे, ही विनंती आहे.

## २) बँक खाते ठेवी व आर्थिक पत्रके

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई, संघटनेचे आय.डी.बी.आय. बँक पुणे येथे बँक खाते असून संघटनेच्या नावे पुणे कॅम्प येथे सदनिका कायमस्वरूपी खरेदी केलेली आहे. सदनिकेची मालमत्ता रु. ८६,१६,९००/- इतक्या रक्कमेची असून आज महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई या नावे रेकॉर्डला नोंद करून संघटनेच्या ताब्यात आहे. सन २०२३ पासून सभासद त्या सदनिकेचा उपभोग घेत आहेत. राज्य कार्यकारिणीच्या सभाही संघटनेच्या ऑफिसमध्ये होत असून इतर होणारा आर्थिक खर्च आज बचत झालेला आहे. आजच्या बाजार भावाने सदर सदनिकेची किंमत सुमारे १.५० कोटी होईल अशी खात्री आहे.

संघटनेची बँक खाती ३१ मार्च २०२५ रोजी असलेली मुदत ठेवीची रक्कम कमी झाली कारण सदनिका खरेदी करण्यात येऊन मालमत्ता झाली. तरीही फक्त सराव परीक्षा व आजीवन सभासद फी, प्रोसेसिंग फी च्या माध्यमातून संघटनेकडे ३१ मार्च २०२५ रोजी मुदत ठेव १५,११,६६५/- रुपयांच्या मुदत ठेवी असून बँक खाती ३,६३,४६१ शिल्लक आहे. अहवाल सालात सराव परीक्षा रॉयल्टी, बुक रॉयल्टी रक्कम अतिशय कमी झालेली असून संस्था चालकांनी १००% विद्यार्थी सराव परीक्षेस बसविणे व प्रत्येक विद्यार्थ्यास बुक दिल्यास संघटनेच्या आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. मात्र राज्यातून सराव परीक्षेस फक्त २५% प्रतिसाद मिळत असल्याने या बाबीचा विचार होणे गरजेचे आहे. भविष्यात परिषदेचे सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध झाल्याने सराव परीक्षा रॉयल्टी कमी होईल अशी स्थिती असल्याने संघटनेच्या उत्पन्नाच्या साधनांबाबत विचार करावा लागेल. तो कार्यकारीणी करेल, संस्थाचालकांनी सहकार्य करावे.

## ३) संगणक टंकलेखन GCC TBC सराव परीक्षा

संघटनेच्या माध्यमातून मॅन्युअल टायपिंग कालावधीपासून सराव परीक्षा घेण्यात येत आहेत, त्याच उत्पन्नातून संघटनेचे खर्च भागविले जात असत. पुढे चालून संगणक टंकलेखन २००० पासून संगणक सराव परीक्षा सुरू करण्यात आल्या. त्यात संघटनेची ०% गुंतवणूक असून बाह्य एजन्सी नेमून सराव परीक्षेचे संचालन केले जात असल्याने आजपावेतो उत्तम प्रकारे सुरू आहे. पूर्वी सभासदांनी डेमो पूर्णपणे व सराव परीक्षा घेण्याकामी टेक रिचेस संस्थेची नेमणुक केली. टेक रिचेसने संघटनेची ७,३५,४०२ रॉयल्टी वर्गणी जमा न केल्याने सदस्यांचे सराव व परीक्षा डेमो पुरविण्याची जबाबदारी मे. प्राजक्ता एंटरप्रायजेसकडे सोपविण्यात आली. प्राजक्ता एंटरप्रायजेसने टेक रिचेसकडील ७,३५,४०२ रुपये भरणा केल्याने संघटनेचे आर्थिक नुकसान टळले. तसेच डेमो पुढेही सुरू राहिल्याने संघटनेची आर्थिक स्थितीही सुधारली गेली. मात्र संस्थाचालक इतर खाजगी डेमोचा वापर जास्त करत असून संघटनेचा डेमो उत्कृष्ट असूनही प्रतिसाद मात्र कमी असल्याचे जाणवत आहे. संघटनेने ऑनलाईन प्रमाणपत्रासाठी रु. १००, ऑफलाईन प्रमाणपत्रासाठी रुपये १४० शुल्क आकारण्याचे राज्य कार्यकारिणीने ठरावाद्वारे मान्यता दिल्याने संस्था चालकांना रु. १०० व रु. १४० डेमो शुल्क पर्याय देण्यात आला. त्याप्रमाणे २०२४-२५ वर्षात पुढील प्रमाणे विद्यार्थी संख्या नोंदणी गेली.

**सराव परीक्षा तपशील**

| सत्र | १०० रु. | १४० रु. | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| जून २०२४ | ४५०३६ | ३१०६ | ४८१४२ |
| डिसें. २०२४ | ३६१७४ | २१३६ | ३८३१० |
| जून २०२५ | ५०८७२ | १९०६ | ५२७७८ |
| डिसें. २०२५ | ४८७३५ | - | ४८७३५ |

म.रा.प.पुणेचे मुख्य परीक्षेस प्रविष्ट होणारी संख्या विचारात घेता संस्था चालकांनी मानसिकता बदलून घेणे गरजेचे आहे. संघटना हित पाहून व फक्त १०० रुपयांत ६ महिने सराव डेमो व त्यात सराव परीक्षा अशी सुविधा असतानाही संस्थाचालकांकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याने संघटनेस संस्था चालकांकडून आर्थिक बळ मिळत नाही. याचा विचार करावा लागेल. अन्यथा विद्यार्थी संख्येअभावी डेमो पुरविणे भविष्यात थांबवावे लागेल कारण डेमोसाठी संघटनेचा खर्च शून्य असला तरी पुरविणाऱ्या एजन्सीला परवडेल असे नाही. म्हणूनच संस्था चालकांनी मुख्य परीक्षेचे विद्यार्थी पैकी किमान ७५% विद्यार्थी संघटनेस नोंदविणे गरजेचे आहे. भविष्यात परीषदेने सॉफ्टवेअर मोफत दिले तरी संघटनेच्या सराव परीक्षा सुरू ठेवण्यात येतील.

## ४) कार्यकारणी सभा मेळावे

सन २०२३-२०२४ अहवाल सालात संघटनेच्या एकूण ४ सभा संपन्न झाल्या. सन २०२४-२०२५ मध्ये एकूण ४ सभा संपन्न झाल्या. मे २०२३ नंतर नगर संघटनेची आमसभा झालेली नाही. कारण २०२३ नंतर निवडणूक वर्ष असल्याने अधिवेशन झाले नाही. त्यामुळे आमसभाही झालेली नाही. पुढे राज्य संघटनेची निवडणूक डिसेंबर २०२४ नंतर जिल्हा संघटनांची बांधणी व निवडणूक प्रक्रिया होण्यास विलंब झाला. संघटनेचे ६१ वे अधिवेशन वाशिम जिल्ह्यात घेण्यात येणार होते, मात्र वेळोवेळी तारखा बदलत गेल्याने अधिवेशन वेळेत घेतले न गेल्याने शेवटी जालना जिल्हा संघटनेला अधिवेशनाची जबाबदारी देण्यात आली. ती जालना जिल्ह्याचे सरचिटणीस संतोष दाणी व जिल्हा अध्यक्ष अरुण चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकारिणीने वेळेत पार पाडली, त्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्य समजतो. पुढील अधिवेशन व आमसभा वेळेत पार पडेल याकामी सर्व कार्यकारिणी निर्णय घेईल, तो सर्वमान्य असावा अशी विनंती आहे.

## ५) प्रोसेसिंग फी (रॉयल्टी)

संघटनेने कोणताही खर्च न करता दिलेले उपक्रम म्हणजे 'आरल पब्लिकेशन'चे ऑब्जेक्टिव्ह बुक, मनीषा फाउंडेशनकडून जी.सी.सी., टी.बी.सी. ३०, ४० बुक, प्राजक्ता एंटरप्रायझेसकडून ई-लर्न डेमो इत्यादीद्वारे रॉयल्टी (वर्गणी) प्राप्त होत असते. पैकी आरल पब्लिकेशन यांनी ऑब्जेक्टिव्ह बुक विक्री नसल्याने रॉयल्टी जमा केलेली नाही. मनीषा फाउंडेशन यांनी रक्कम रुपये ३०,००० रॉयल्टी जी.सी.सी., टी.बी.सी. बुक विक्रीची जमा केलेली आहे. प्राजक्ता एंटरप्रायझेस यांनी रक्कम रुपये ३१ मार्च २०२४-२५ पूर्वी १३,६५,००० व ३१ मार्च २०२६ पूर्वी ५,००,००० अशी एकूण १८,३५,००० रॉयल्टी जमा केलेली आहे. रॉयल्टी बाबत सभासदांना सविस्तर माहिती हवी असल्यास सभेपूर्वी मागणी करावी, म्हणजे सभेत त्यांची माहिती लेखी सादर केली जाईल.

## ६) संघटनेची निवडणुक

संघटनेची निवडणूक कायदेशीर सल्लागार व निवडणूक निर्णय अधिकारी श्री. ॲड. विठ्ठल शंकर बडे यांनी सन २०२४-२०२५ ते २०२८-२०२९ कालावधीची निवडणूक प्रक्रिया उत्तम प्रकारे राबविली. मागील आमसभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार निवडणूक डिपॉझिट घेण्यात येऊन जिल्हा स्तरावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यातून संघटनेचा शून्य खर्च झाला, कारण डिपॉझिटच्या रकमेतून निवडणूक खर्च भागवण्यात येऊन नवीन आदर्श निर्माण करण्यात आले. याकामी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. ॲड. विठ्ठल बडे सर यांना सहाय्यक निवडणूक अधिकारी श्री. ॲड. शेखर दरंदले पाटील यांनी मदत केली. तर अविरोध निवडून आलेले इतर जिल्ह्यातील सदस्य व काही संस्था चालकांनी सहाय्यक निवडणूक प्रतिनिधी म्हणून योगदान दिले, त्याबद्दल सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

## ७) आमसभा व अधिवेशन

संघटनेचे ५९ वे आमसभा व ६० वे हिरक महोत्सवी अधिवेशन अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्याचे शिर्डी येथे यशस्वीपणे पार पडले. या अधिवेशनास राज्याचे शिक्षण मंत्री नामदार दीपकजी केसरकर व आमदार, अधिकारी वर्ग उपस्थित राहिले. सुधारित नियमावली १९९१-२०२३ मधील जाचक अटी व बहिस्थ मुद्दा निर्णय रद्द करणेत यशस्वी झाले. पुढील काळात अध्यक्ष डॉ. महेश पालकर व डॉ. नंदकुमार बेडसे यांचे अध्यक्ष काळात अनेक महत्त्वाची कामे मार्गी लागली याचा आनंद आहे. या कामी माझे अहिल्यानगर जिल्ह्यातील संस्थाचालक, संघटना पदाधिकारी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आभार. जालना अधिवेशन ५ एप्रिल २०२६ रोजी जालना येथे होणारे ६१ वे अधिवेशन व ६० वी आमसभा जालना जिल्हा संघटनेने यशस्वी करण्याचा ध्यास घेतला त्यासाठी संघटनेचे सरचिटणीस संतोष दाणी, जिल्हाध्यक्ष अरुण चव्हाण व सर्व कार्यकारिणी यांना धन्यवाद देतो.

## ८) अधिवेशनातील शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेकडील महत्वपूर्ण मागण्या पुढीलप्रमाणे

शासनाकडील व परीक्षा परीषदेकडील महत्त्वाच्या मागण्या:

१) सुधारित नियमावली १९९१-२०२६ टंकलेखन, संगणक टंकलेखन, लघुलेखन मान्यता व संचलन. (शैक्षणिक पात्रता ६वी शहरी १ कि.मी. व ग्रामीण ३ कि.मी. अंतर, संस्थाचालकांची प्राचार्य पद, शुल्कवाढ, प्रोप्रायटरशीप, आदि दुरुस्तीसह सादर नियमावलीस) तत्काळ मान्यता देणे.

२) महाराष्ट्र राज्य ज्ञानमंडळ (MKCL) चा CCPT, कौशल्य विकास व्यवसाय शिक्षण मंडळ कॉम्प्युटर टायपिंग यांनी टंकलेखन अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न चालवला, त्यास शासनाची मान्यता न देणे.

३) शासनाचे महामंडळ : सारथी, बार्टी, महाज्योती, अल्पसंख्याक कामगार मंडळ, अमृत या मंडळांचे प्रशिक्षण अभ्यासक्रमात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा संगणक टंकलेखन GCC-TBC व लघुलेखन GCC अभ्यासक्रमाचा समावेश करून उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना शुल्क परत करणे.

४) महाराष्ट्र राज्यात विनाअनुदानित संस्था चालकांना 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ' योजनेसारखी 'लाडका संस्था चालक' योजना सुरू करून आर्थिक मदत करणेबाबत.

५) महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाचे नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड (NCMC) चे काम चालू असलेल्या शासनमान्य प्राप्त संस्थांना देऊन प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देणे.

६) संगणक टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांना शैक्षणिक दराने विद्युत पुरवठा लागू करणे.

७) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून वर्षात ३ परीक्षांचे आयोजन करणे.

८) महाराष्ट्र राज्यात प्रत्येक तालुक्यात परीक्षा केंद्रासाठी शासनाने आर्थिक मदत करणे.

९) शासनमान्य संस्था या स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रोप्रायटरशिप पद्धतीने स्थापन झालेल्या असल्याने, सुधारित नियमावलीत धर्मादाय संस्था वगळून प्रोप्रायटरशिप पद्धत सुरू ठेवणे.

१०) शासनमान्य प्रशिक्षण संस्थांना कोणतेही अनुदान किंवा आर्थिक मदत नसल्याने शहरी भागात १ कि.मी. व ग्रामीण भागात ३ कि.मी. अंतर पूर्वीप्रमाणे ठेवणे.

११) शासनमान्य प्रशिक्षण संस्थांप्रमाणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. व बायोमेट्रिक हजेरी (आधारबेस) लागू करणे.

१२) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून GCC-TBC ३०, ४०, ५०, ६०, इंग्रजी व मराठी/हिंदी ३०, ४० अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करून देणे.

१३) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे LMS सॉफ्टवेअर सक्तीचे न करता ऑफलाईन व संस्थेच्या लॉगिन मधून उपलब्ध करून देणे.

१४) संगणक टंकलेखन प्रशिक्षण, अभ्यासक्रमाची शैक्षणिक पात्रता इयत्ता ६ वी करणे.

१५) संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थांना शासन मान्यता, शालेय शिक्षण विभागीय व हस्तांतर, स्थलांतर मान्यता अधिकार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे देणे.

१६) जिल्हा व विभागीय समित्या गठित करण्याबाबत सुधारित नियमावलीमध्ये तरतूद करणे.

१७) महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेने GCC-TBC परीक्षा, सॉफ्टवेअर स्वतः तयार करुन परीक्षा घेणे अथवा मराठी व हिंदी विषयाच्या परीक्षा सुरळित होणे कामी ठोस निर्णय घेणे.

## ९) MKCL-CCTP व कौशल्य विकास व्यवसाय मंडळ टायपिंग कोर्स

राज्यातील स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेल्या टंकलेखन व्यवसायात संगणकीय युगात कॉम्प्युटर टायपिंग ३०, ४० अभ्यासक्रम देण्यात येऊन ३१ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन आदेशाने पुढे कार्यान्वित झाला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची पुणे या स्वायत्त संस्थेने तो यशस्वीपणे राबविला. पुढे ऑनलाईन लघुलेखन परीक्षेचा प्रयोगही यशस्वी झाला. भारतात महाराष्ट्र राज्य हे संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा ऑनलाईन घेणारे पहिले राज्य ठरले. सर्वत्र आनंदी आनंद सुरू असताना राज्यातील संस्था चालकांना वेळोवेळी अनेक धक्कादायक निर्णय झाले. आजही काही अटी कायम आहेत. मात्र टंकलेखन संघटना खंबीरपणे सामोरे जात आहे. एक नव्हे दोन वेळा बहिस्थ मुद्दा निर्माण झाला. मात्र संघटनेने त्यावर आंदोलन करून मात केली. शासनाला निर्णय बदलायला भाग पाडले तसेच आता 'CCTP' नावाने टायपिंग कोर्स सुरु करण्याचे परिपत्रक काढले. त्यापूर्वी व्यवसाय शिक्षण मंडळाने पूर्वीच्या शासन जी.आर.मध्ये कॉम्प्युटर टायपिंगचा अभ्यासक्रम घुसविण्याचा प्रयत्न करून अनैसर्गिक स्पर्धा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही विभागांच्या परीक्षा या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेतच होणार असल्याने व कोर्स कालावधी निश्चित नसल्याने फक्त प्रमाणपत्र वितरित करण्याचा घाट हाणून पाडण्यासाठी संघटनेने शासनाकडे तसेच सर्व विभागांच्या प्रधान सचिव, परीक्षा परिषद, मंडळाकडे रीतसर पत्रव्यवहार केला. राज्यातील संस्था चालकांची व परीक्षा परिषदेची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यासाठी राज्यातून अनेक खासदार महोदय, आमदार महोदयांची या कोर्सला मान्यता देऊ नये म्हणून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना शिफारस पत्रे घेऊन सादर केली. यावर अवलंबून न राहता मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठात याचिका १४९९३/२०२५ दाखल करून संस्थाचालकांची बाजू खंबीरपणे मांडून न्यायालयाचे लक्ष वेधले. किंबहुना न्यायालयाने संबंधित विभागांना नोटीस बजावून म्हणणे सादर करण्याचे आदेश पारित केले. यामुळे संघटनेस मोठे यश प्राप्त झाले आहे. पुढेही आंदोलन असो किंवा मंत्रालय असो, संघटना खंबीरपणे विरोध करून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे कार्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही देतो. अधिवेशनातील उपस्थित मान्यवरांनीही या विषयात गांभीर्याने लक्ष देऊन शासन दरबारी न्याय द्यावा अशी विनंती करतो.

## ऋणनिर्देश

संघटनेच्या वाटचालीत शासन-प्रशासन स्तरावर महत्त्वपूर्ण सहकार्य करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री ना. स्व. अजितदादा पवार, राज्याचे शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे साहेब, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर साहेब, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डॉ. इंद्रनिल नाईक साहेब, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण, ऊर्जा मंत्री ना. अतुलजी सावे साहेब, समाजकल्याण मंत्री संजयजी शिरसाठ साहेब यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले, सहकार्य केले. यांचे विशेष आभार मानतो. तसेच राज्यातील मान्यवर, खासदार, आमदार महोदय यांनी वेळोवेळी शिफारस पत्र देऊन उपकृत केले, उत्साह वाढवला. त्यांनाही धन्यवाद देतो. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव देओल साहेब, उपसचिव महाजन साहेब, कक्ष अधिकारी मृणाली काटंगे मॅडम, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक , महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे साहेब, तत्कालीन आयुक्त अनुराधा ओक, नूतन आयुक्त महेश चोथे, सहाय्यक आयुक्त मंगला वाव्हळ, प्रशासन अधिकारी, मूल्यमापन अधिकारी, सर्व परिषदेचे कर्मचारी, अधिकारी यांचे आभार.

सर्व विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) संघटनेचे सर्व जिल्हा प्रतिनिधी राज्य संघटनेचे सर्व आजीवन सभासद यांचेही सहकार्याबद्दल आभार.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे माजी अध्यक्ष महावीर माने साहेब, शिक्षणतज्ज्ञ रमेश खानविलकर, मालेगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुधीर अक्कार साहेब, ॲड. एन.बी. नरवडे, ॲड. शेखर दरंदले पाटील, महा जनहित मंचचे सरचिटणीस संघटनेचे माजी सरचिटणीस हेमंत ढमढेरे, सर्व आजी-माजी पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. सर्वांचे मनःपूर्वक आभार! जालना जिल्हा संघटनेने ६१ व्या अधिवेशनाची जबाबदारी स्वीकारली त्याबद्दल जनरल सेक्रेटरी स्वागताध्यक्ष संतोष दाणी, जिल्हा अध्यक्ष अरुण चव्हाण, सचिव डॉ. सुनिल भावसार, सर्व जिल्हा कार्यकारिणी व संकटमोचन स्मरणिकेची जबाबदारी पार पाडणाऱ्या स्मरणिका प्रमुख श्रीमती अनुराधा थिटे मॅडम, त्यांचे सर्व समिती सदस्य, अधिवेशन समित्या प्रमुख सर्वांचे हार्दिक आभार मानतो. संघटनेचा अहवाल मांडतो, स्वीकार व्हावा. कोणाच्या भावना दुखावल्यास, नामोल्लेख राहिल्यास दिलगिरी व्यक्त करतो.

जय महाराष्ट्र! जय MSCEIA

प्रकाश हिराबाई भिमराज कराळे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन,
संगणक टंकलेखन शासनमान्य संस्थांची संघटना

नोंदणी क्र. एफ ९३४/मुंबई/१९६२

# महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मंबई

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ ला मजला, महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अहिल्यानगर - ४१४००१.
दुरध्वनी क्र : ०२४१-२३२२६३९, मो.नं. ९४२२२२१९०८
वेबसाईट : www.msceia.co.in

जा.क्र. मराटलंशासंसं/६० वी आमसभा / २०२६ दिनांक : १५ मार्च २०२६

## ६० वी वार्षिक आमसभा

(फक्त अजीव सभासदांकरीता)

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य शैक्षणिक संस्थाची संघटना, मुंबई ची **६० वी आमसभा** वार - **रविवार दि. ५/४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ठिकाण** : **मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृह, जालना** या ठिकाणी अध्यक्ष श्री. प्रकाश भिमराज कराळे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी आपण आम सभेस अवश्य उपस्थित रहावे हि विनंती.

### ※ सभेपुढील विषय ※

१) संघटनेच्या ६० व्या आमसभेचे विषयपत्रिकेचे वाचन करणे.
२) संघटनेच्या ५ मे २०२३ विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.
३) संघटनेच्या ६ मे २०२३ रोजी झालेल्या ५९ व्या आमसभेचे इतिवृत्त कायम करणे.
४) संघटनेच्या २०२३ अखेरच्या अहवालाची नोंद घेणे.
५) मा. चार्टड अकौंटंट कडून प्रमाणित झालेले संघटनेचे सन २०२३-२४, २०२४-२५ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मान्यता देणे. (आर्थिक पत्रके संघटनेच्या वेब साईटवर प्रसिध्द केलेले आहे.)
६) सन २०२६-२७ वर्षातील कामकाजाची रुपरेषा ठरविणे.
७) संघटनेची सरावा परीक्षा, प्रोसेसिंग फी, रॉयल्टी याची नोंद घेणे.
८) सुधारित नियमावली १९९१-२०२६ बाबत शासनस्तरावर झालेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.
९) शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदे कडील मागण्यांबद्दल विचार-विनिमय करणे.
१०) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

**मा. कार्यकारी समिती यांचे संमतीने**

**संतोष दाणी**
**जनरल सेक्रेटरी**

**ठिकाण : पुणे**
**दि. १५/०३/२०२६**

**टिप** : १. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास, अर्ध्या तासाने सभा त्याच ठिकाणी सुरु करण्यात येईल व अशा सभेस कोरम ची आवश्यकता राहणार नाही. २. सभासदांना आमसभेत काही प्रश्न विचारावयाचे झाल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात दि. ३१/०३/२०२६ अखेर अध्यक्ष/महासचिवांकडे पाठवावेत. ३. वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके सोबत जोडली आहे सभासदांना सभेच्या ठिकाणी देण्यात येतील आणि संघटना वेबसाईट वर प्रसिध्द केले आहे. ४. संस्थेच्या ५९ व्या आमसभा दि. ६/५/२०२३ व दि. ५/५/२०२३ विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संघटनेच्या आजीव सभासदांनी संघटनेच्या वेबसाईटवर (www.msceia.co.in) उपलब्ध करुन दिलेली आहे.

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950**
**SCHEDULE VII (Vide Rule 17(1) )**
**Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.**
**Registration No. F - 934 (M)**

**BALANCE SHEET AS ON 31ST MARCH, 2024**

| FUNDS & LIABILITIES | RS. | RS. |
|---|---|---|
| **TRUST FUNDS OR CORPUS** | | |
| Life Membership Fees | | |
| Balance as per last Balance Sheet | 14,89,206 | |
| Add : Addition During the year | 54,801 | |
| Less : Withdrawal during the year | - | 15,44,007 |
| **OTHER EARMARKED FUNDS** | | |
| (Created under the provisions of the Trust Deed or scheme or out of the Income) | | |
| Depreciation Fund | - | |
| Sinking Fund | - | |
| Reserve Fund | - | - |
| **Any Other Fund** | | |
| **I) Building Fund** | | |
| Balance as per last Balance Sheet | 12,16,084 | |
| Add : Addition During the year | 57,225 | |
| Less : Withdrawal during the year | - | 12,73,309 |
| **II) President Fund** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,00,202 | |
| Add : Addition During the year | | |
| Less : Withdrawal during the year | | 1,00,202 |
| **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | |
| IDBI Bank OD | 8,99,334 | |
| From Trustee | - | |
| Sindhu Durga District | 25,000 | |
| Deposit From Techriches | - | 9,24,334 |
| **Provisions** | | |
| For Audit Fees | 11,800 | |
| For Legal Fees | 4,000 | |
| For District Representative Payable | 4,59,585 | |
| For Prelimnary Exam Fees Payable | - | |
| For Honorarium to President & Treasurer Staff | 1,92,000 | |
| For Account Writing Charges | 14,000 | 6,81,385 |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | |
| Balance as per last Balance Sheet | 66,43,739 | |
| Less : Appropriation if any | | |
| Add : Surplus as per Income & Exp. A/c | - | |
| Add : Deficit as per Income & Exp. A/c | 3,12,795 | 63,30,944 |
| **Total Rs.** | | **1,08,54,181** |

| PROPERTY & ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|
| **IMMOVABLE PROPERTIES** | | |
| (at cost) | | |
| Office Flat at Pune | 86,16,900 | 86,16,900 |
| FURNITURE & FIXTURES | 40,850 | |
| Less : Depreciation @ 10% | 4,085 | 36,765 |
| ELECTRICAL FITTINGS | 6,850 | |
| Less : Depreciation @ 15% | 1,027 | 5,822 |
| **INVESTMENTS :** | | |
| Fixed Deposits with Bank | 12,88,579 | |
| Add : Interest Received | 74,899 | 13,63,478 |
| Tax Deducted at Source 2021-22 | 33,976 | |
| Tax Deducted at Source 2022-23 | 6,521 | |
| Tax Deducted at Source 2023-24 | 8,322 | 48,820 |
| **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | |
| Goods / Doubtful | | |
| Loan Scholership | | |
| Other Loans | - | - |
| **ADVANCES :** | | |
| To Trustees | | |
| To Employees | | |
| To Others- | | |
| GCC & TBC Preliminary Exam Fees Receivable | - | |
| Moksha Advertisment | 1,00,000 | 1,00,000 |
| **Sundry Debtors** | | |
| Anil Kadu Amravati | 700 | |
| Jayshree Patil Aurangabad | 1,025 | |
| Shivaji Jagtap Yavatmal | 325 | |
| Royalty receivable from Techriches | - | 2,050 |
| **INCOME OUTSTANDING** | | |
| Rent | | |
| Interest | | |
| Other Income | | - |
| **CASH AND BANK BALANCES-** | | |
| A. In Current Account - | | |
| IDBI Bank Balance | 6,66,078 | |
| Axis Bank Balance | - | 6,66,078 |
| B. With The Trustees | | 14,267 |
| **Total Rs.** | | **1,08,54,181** |

**The above Balance Sheet to the best of My /Our Belief Contains a True Account Of The Funds and Liabilities and of the Property and Assets Of the trust**

**For M/s. Kanakiya & Mehta Associates**
**Chartered Accountants**

**Mr. Abhay A. Katariya**
**Partner**
**Mem. No. 113895**
**UDIN : 24113895BKDIDK3891**
**Date -27/09/2024**
**Place-Ahmednagar**

Kanakiya & Mehta Associates, Chartered Accountants, Firm Reg. No. 104702W, Ahmednagar

Trustee

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई

Treasurer

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950
SCHEDULE IX-C (Vide Rule 17(1) )
Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.
Registration No. F - 934 (M)
INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH, 2024

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **To Expenditure in respect of Properties :** | | | | | |
| Rates, Taxes, Cesses | | | **By Rent :** Accrued | | |
| Repairs and Maintenance | | | Realised | | - |
| Salaries | | | | | |
| Insurance | | | **By Interest :** Accrued | | |
| Depreciation (by way of | | | Realised | 83,221.00 | |
| provision or adjustments) | | - | on Securities | | |
| | | | on Loans | | 83,221.00 |
| **To Other expenses** | | | | | |
| Legal charges | 2,000.00 | | **By Dividend** | | - |
| Honorarium to Staff | 96,000.00 | | | | |
| Professional Fees | 2,950.00 | | | | |
| Charity Commissioner Expenses | 54,000.00 | | **By Donation in Cash or Kind** | | 11,000.00 |
| Advertisement Expenses | 30,000.00 | 1,84,950.00 | | | |
| | | | **By Grant Received** | | - |
| **To Establishment Expenses** | | | | | |
| Printing and Stationary (Calendar & Annual Rep | 1,17,000.00 | | **By Royalty Received** | | 60,000.00 |
| Newspaper and Periodicals | - | | | | |
| Annual Meeting (Adhiveshan) Expenses | 50,000.00 | | **By Income from other Sources** | | |
| Meeting Expenses | 12,329.00 | | | | |
| Special Programme Expenses | - | | Examination Fees | | - |
| Welfare Expenses | - | | Computer Processing Fees Received | | 14,700.00 |
| Office Expenses | - | 1,79,329.00 | Income Tax Refund | | - |
| | | | Other Income ( Written Back) | | |
| **To Remunaration To Trustees** | | - | For Expenses | - | |
| **To Remunaration** | | - | For Advances from L M | - | - |
| (In case Of a Maths To The head Of | | | | | |
| Math,Including His House hold | | | **By Other Receipts :** | | |
| Expenditure, if any) | | | (in details as far as possible) | | |
| | | | Annual Membership Fees | | |
| **To District Association contribution** | | - | Flood Affected Fund Received | | - |
| **To Trust Returns online Professional Fees** | | - | | | |
| **To Audit Fees** | | 11,800.00 | **By Library Fees** | | - |
| **To 80G & 12A Registration Professional Fees** | | - | | | |
| **To Account writing Charges** | | 8,000.00 | **By Transfers From Reserves** | | |
| **To Amount Written off** | | | **By Deficiet Carried Over to -** | | |
| a) Bad Debts (Sultan Sayyad) | - | | **Balance Sheet** | | 3,12,794.94 |
| b) Loan Scholarship | | | | | |
| c) Irrecoverable Rents | | | | | |
| d) Other items | | - | | | |
| **To Miscellaneous Expenses** | | | | | |
| Travelling Expenses | 10,000.00 | | | | |
| Trust office inaugural expenses | - | | | | |
| Postage and Telegram | - | | | | |
| Strike/Dharana Charges | - | | | | |
| Election Expenses | - | | | | |
| Interest and Bank Charges | 74,584.50 | | | | |
| Designing Charges | - | | | | |
| Electricity Expenses | 7,940.00 | 92,524.50 | | | |
| **To Depreciation** | | 5,112.44 | | | |
| **To Amount Transferred to Reserve** | | | | | |
| **or Specific fund** | | - | | | |
| **To Expenditure on object of the Trust :** | | | | | |
| a. Religious | - | | | | |
| b. Educational | - | | | | |
| c. Medical Relief | - | | | | |
| d. Relief on Poverty | - | | | | |
| e. Other Chartiable Objects | - | - | | | |
| **Total Rs.** | | **4,81,715.94** | **Total Rs.** | | **4,81,715.94** |

**As per our report of even date**
**For M/s. Kanakiya & Mehta Associates**
**Chartered Accountants**

Kanakiya & Mehta Associates
Firm Reg. No. 104702W
Ahmednagar
Chartered Accountants

**Mr. Abhay A. Katariya**
**Partner**
**Mem. No. 113895**
**UDIN : 24113895BKDIDK3891**
**Date -27/09/2024**
**Place-Ahmednagar**

Trustee अध्यक्ष Treasurer
महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950**
**SCHEDULE VII (Vide Rule 17(1) )**
**Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.**
**Registration No. F - 934 (M)**

**BALANCE SHEET AS ON 31ST MARCH, 2025**

| FUNDS & LIABILITIES | RS. | RS. | PROPERTY & ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **TRUST FUNDS OR CORPUS** | | | **IMMOVABLE PROPERTIES** | | |
| Life Membership Fees | | | (at cost) | | |
| Balance as per last Balance Sheet | 15,44,007 | | Office Flat at Pune | | 86,16,900 |
| Add : Addition During the year | 4,701 | | | | |
| Less : Withdrawal during the year | - | 15,48,708 | FURNITURE & FIXTURES | 36,765 | |
| | | | Less : Depreciation @ 10% | 3,677 | 33,089 |
| **OTHER EARMARKED FUNDS** | | | | | |
| (Created under the provisions of the | | | ELECTRICAL FITTINGS | 5,822 | |
| Trust Deed or scheme or out of the Income) | | | Less : Depreciation @ 15% | 873 | 4,949 |
| Depreciation Fund | | | | | |
| Sinking Fund | | | **INVESTMENTS :** | | |
| Reserve Fund | | - | Fixed Deposits with Bank | 13,63,478 | |
| | | | Add : Interest Received | 90,983 | 14,54,461 |
| **ANY OTHER FUND** | | | | | |
| I) Building Fund | | | Tax Deducted at Source 2021-22 | 33,976 | |
| Balance as per last Balance Sheet | 12,73,309 | | Tax Deducted at Source 2022-23 | 6,521 | |
| Add : Addition During the year | 4,300 | | Tax Deducted at Source 2023-24 | 8,327 | |
| Less : Withdrawal during the year | - | 12,77,609 | Tax Deducted at Source 2024-25 | 9,124 | 57,944 |
| II) President Fund | | | **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,00,202 | | Goods / Doubtful | | |
| Add : Addition During the year | | | Loan Scholarship | | |
| Less : Withdrawal during the year | | 1,00,202 | Other Loans | - | - |
| **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | | **ADVANCES :** | | |
| IDBI Bank OD | 8,72,667 | | To Trustees | - | |
| From Trustee | - | | To Employees | - | |
| Sindhu Durga District | - | 8,72,667 | To Others- | - | |
| | | | Moksha Advertisment | 1,00,000 | 1,00,000 |
| **SUNDRY CREDITORS** | | | | | |
| Subhash Kashinath Bagad | 5,000 | 5,000 | **SUNDRY DEBTORS** | | |
| | | | Anil Kadu Amravati | 700 | |
| **PROVISIONS** | | | Jayshree Patil Aurangabad | 1,025 | |
| For Audit Fees | 17,700 | | Shivaji Jagtap Yavatmal | 325 | |
| For Legal Fees | 4,000 | | Royalty receivable from Techriches | - | 2,050 |
| For District Representative Payable | 1,09,644 | | | | |
| For Preliminary Exam Fees Payable | - | | **INCOME OUTSTANDING** | | |
| For Honorarium to State Association Representative | 1,44,000 | | Rent | - | |
| For Account Writing Charges | 24,000 | 2,99,344 | Interest | 260 | |
| | | | Preliminary Exam Fee Receivable | 3,09,520 | 3,09,780 |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 63,30,944 | | **CASH AND BANK BALANCES-** | | |
| Less : Appropriation if any | | | A. In Current Account - | | |
| Add : Surplus as per Income & Exp. A/c | 5,08,316 | | IDBI Bank Balance | 3,63,551 | |
| Add : Deficit as per Income & Exp. A/c | - | 68,39,261 | Axis Bank Balance | - | 3,63,551 |
| | | | B. With The Trustees | | 69 |
| Total Rs. | | 1,09,42,751 | Total Rs. | | 1,09,42,793 |

For M/s. Kanakiya & Mehta Associates
Chartered Accountants

Mr. Abhay A. Katariya
Partner
Mem. No. 113999
UDIN : 25113999BMIKSQ1915
Date -30/09/2025
Place-Ahmednagar

Kanakiya & Mehta Associates Chartered Accountants Firm Reg. No. 104702W Ahmednagar

The above Balance Sheet to the best of My /Our Belief Contains a True Account Of The Funds and Liabilities and of the Property and Assets Of the Trust

विश्वस्त

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950
SCHEDULE IX-C (Vide Rule 17(1) )
Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.
Registration No. F - 934 (M)
INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH, 2025

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **To Expenditure in respect of Properties :** | | | | | |
| Rates, Taxes, Cesses | - | | By Rent : Accrued | - | |
| Repairs and Maintenance | - | | Realised | - | - |
| Salaries | - | | | | |
| Insurance | - | | By Interest : Accrued | - | |
| Depreciation (by way of | 4,550 | | Realised | 1,00,367 | |
| provision or adjustments) | | 4,550 | on Securities | - | |
| | | | on Loans | - | 1,00,367 |
| **To Other expenses** | | | | | |
| Charity Commissioner Expenses | - | | **By Dividend** | | - |
| Advertisement Expenses | - | - | | | |
| **To Establishment Expenses** | | | **By Donation in Cash or Kind** | | 11,200 |
| Special Programme Expenses | - | | | | |
| Welfare Expenses | - | | **By Grant Received** | | - |
| Office Expenses | - | - | | | |
| | | | **By Royalty Received** | | 30,000 |
| **To Remunaration To Trustees** | | - | | | |
| **To Remunaration** | | - | **By Income from other Sources** | | |
| (In case Of a Maths To The head Of | | | | | |
| Math,Including His House hold | | | Examination Fees | - | |
| Expenditure, if any) | | | Computer Processing Fees Received | 8,18,746 | |
| | | | Income Tax Refund | - | |
| **To District Association contribution** | | - | Election Non-refundable Deposit | 3,05,103 | |
| **To Trust Returns online Professional Fees** | | - | Other Income ( Written Back) | | |
| **To Audit Fees** | | 17,700 | For Expenses | - | |
| **To 80G & 12A Registration Professional Fees** | | - | For Advances from I. M | - | 11,23,849 |
| **To Account writing Charges** | | 10,000 | | | |
| | | | **By Other Receipts :** | | |
| **To Amount Written off** | | | (in details as far as possible) | | |
| a) Bad Debts (Sultan Sayyad) | - | | Annual Membership Fees | - | |
| b) Loan Scholarship | - | | Flood Affected Fund Received | - | - |
| c) Irrecoverable Rents | - | | | | |
| d) Other Items | - | - | **By Library Fees** | | - |
| **To Miscellaneous Expenses** | | | **By Transfers From Reserves** | | - |
| Trust office inaugural expenses | - | | | | |
| Strike/Dharana Charges | - | | **By Deficiet Carried Over to -** | | |
| Bank Charges | 436 | 436 | **Balance Sheet** | | - |
| **To Amount Transferred to Reserve or Specific fund** | | - | | | |
| **To Expenditure on object of the Trust :** | | | | | |
| a. Religious | - | | | | |
| b. Educational | 7,24,414 | | | | |
| c. Medical Relief | - | | | | |
| d. Relief on Poverty | - | | | | |
| e. Other Charitable Objects | - | 7,24,414 | | | |
| **To Surplus carried over to BalanceSheet** | | 5,08,316 | | | |
| **Total Rs.** | | **12,65,416** | **Total Rs.** | | **12,65,416** |

As per our report of even date
For M/s. Kanakiya & Mehta Associates
Chartered Accountants

Kanakiya & Mehta Associates
Firm Reg. No. 104702W
Ahmednagar
Chartered Accountants

Mr. Abhay A. Katariya
Partner
Mem. No. 113895
UDIN : 25113895BMIKSQ1915
Date -30/09/2025
Place-Ahmednagar

विश्वस्थ

जनरल सेक्रेटरी

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना मुंबई

# महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन शासनमान्य संस्थाची संघटना, मुंबई
(MRTLSSSM) (MSCEIA)

## राज्य कार्यकारिणी २०२४-२५ ते २०२८-२९


श्री. प्रकाश कराळे
अध्यक्ष


श्री. संतोष दाणी
महासचिव
स्वागताध्यक्ष


श्री.घनश्याम कुंबलकर
वरिष्ठ उपाध्यक्ष


श्री. सुरेश देवरे
परीक्षा सचिव


श्री. पंकज ठाकुर
कोषाध्यक्ष


श्री. जोसेफ रुबेन
प्रसिध्दी प्रमुख


श्री. गोवर्धन विरकुंवर
प्रवक्ता

| | |
|---|---|
| श्री. श्रीकांत केशव जोशी | सह. कोषाध्यक्ष |
| श्री. अनिल जीवनधरराव कडू | उपाध्यक्ष |
| श्री. संजय बाबुराव राणे | उपाध्यक्ष |
| श्रीमती. जयश्री प्रतापसिंग पाटील | उपाध्यक्ष |
| श्री. समीर अशोक म्हात्रे | उपाध्यक्ष |
| श्री. सचिन बापू घाटगे | उपाध्यक्ष |
| श्री. शोएब सिकंदर मुजावर | नि. उपाध्यक्ष |
| श्री. रोडगे प्रताप शिवाजीराव | सदस्य तथा नि. उपाध्यक्ष |
| श्री. वसंत रामचंद्र तांबोळी | सदस्य तथा नि. उपाध्यक्ष |
| श्री. तुळशीदास नारायणराव खसाळे | परीक्षा सहसचिव |
| श्री. शेख सत्तार शेख रज्जाक | परीक्षा सहसचिव |
| श्री. प्रमोद बाळकृष्ण वाणी | परीक्षा सह सचिव |
| श्री. शैलेंद्र मनोहर पाटील | का. ज्येष्ठ सदस्य |
| श्री. संजय गोपाळराव नाईक | कार्यकारणी सदस्य |
| श्री. सुभाष काशिनाथ बागड | स्विकृत सदस्य |
| सौ. हेमलता हेमंत ढमढेरे | स्विकृत सदस्या |
| श्री. विठ्ठल शंकरराव बड़े | समन्वय सदस्य |
| श्री. दिपक नारायणराव ठाकरे | समन्वय सदस्य |

| | |
|---|---|
| श्री. संजय गजाननराव लेडांगे | सह सचिव |
| श्री. अनुरथ बाबुराव घुमरे | उपाध्यक्ष |
| श्री. नरेश वामनराव बोमेवार | उपाध्यक्ष |
| श्री. रविकांत विठ्ठलराव पवार | उपाध्यक्ष |
| श्री. सुभाष भगवानराव नाईकवाडे | उपाध्यक्ष |
| श्री. शशिकांत प्रभाकर रसाळ | नि.उपाध्यक्ष |
| श्री. संजय सिताराम बोराटे | नि.उपाध्यक्ष |
| श्री. लतिश भाऊसाहेब बलकवडे | परीक्षा सहसचिव |
| श्री. ज्ञानेश्वर मारोती वाघ | परीक्षा सहसचिव |
| श्री. महादेव किसन शिवरकर | परीक्षा सहसचिव |
| श्री. अरुण फत्तेलाल चांडक | का. सदस्य अध्यक्ष स. समिती |
| श्री. संतोष काशिनाथ झंजाड | सदस्य तथा नि. संघटक |
| ॲड. योगेश गोरख सोन्ने | कार्यकारणी सदस्य |
| श्री. निळकंठ कुंभार | कार्य. सदस्य १४-०९-२०२५ पर्यंत |
| श्री. गिरीश नारायण बत्तुल | कार्य. सदस्य २८-०२-२०२६ पासुन |
| श्रीमती अनुराधा विवेक थिटे | स्विकृत सदस्या |
| श्रीमती. संध्याताई देशपांडे | समन्वय समिती सदस्या |
| | |